**मनरेगातंर्गत कामांना प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीचे धोरण अधिक स्पष्ट व सुटसुटीत करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०,**

१६ वा मजला, नवीन प्रशासन इमारत,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०३ जानेवारी, २०२३.

**संदर्भ**:- १) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००५/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दिनांक २३ डिसेंबर, २००५.
२) शासन निर्णय नियोजन विभाग, क्रमांक :मग्रारोहयो-२००६/प्र.क्र.१०४/रोहयो-१०, दिनांक १९ ऑक्टोबर, २००६.
३) शासन निर्णय क्रमांक :मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०, दिनांक ०८ जून, २०१०.
४) शासन परिपत्रक क्रमांक :मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०, दिनांक २२ मार्च, २०११.
५) शासन निर्णय क्रमांक :मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र.४७/रोहयो-१०, दिनांक ०३ ऑगस्ट, २०११.
६) शासन निर्णय क्रमांक- मग्रारो-२०२२/प्र.क्र.१७४/रोहयो-६अ, दिनांक १४ डिसेंबर, २०२२.

**प्रस्तावना :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या अंमलबजावणीमध्ये सुधारणा करणे, तसेच सदर योजना राज्यात प्रभावीपणे राबविणे, कामामध्ये गती व गुणवत्ता राखून केंद्रीय निधीचा जास्तीत जास्त वापर करणे, इत्यादींचा विचार करुन संदर्भ क्र. ५ येथील शासन निर्णयानुसार मनरेगातंर्गतच्या कामाकरीता प्रशासकीय व तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार वित्तीय मर्यादा घालून तालुकास्तरापर्यंत विकेंद्रीत करण्यात आले होते. त्यानंतरच्या काळात मनरेगाच्या अंमलबजावणीत दोन संगणक प्रणाली, नरेगा सॉफ्ट व सेक्युलर यांचे वापर सुरु झाले. सद्यस्थितीत सेक्युलर संगणक प्रणाली फक्त पंचायत कार्यान्वयीन यंत्रणेस लागू करण्यात आले आहे. त्याशिवाय सर्व कार्यान्वयीन यंत्रणेस सेक्युलर संगणक प्रणाली लागू नाही.

तसेच जिल्हा पातळीवर अकुशल व कुशलचे प्रमाण ६०:४० वर राखावयाचे असल्याने महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमातील तरतूदीनुसार व प्रमाण राखावयाच्या गरजेनुसार काही कामे घेण्यासाठी शासनाने ग्रामपंचायतींना सूचना करणे अगत्याचे झाले आहे. मनरेगाचे उद्दिष्ट “गरीबांच्या उपजिवीकेचे साधन मजबूत करणे” असल्याने या उद्देशास धरुन संदर्भ क्र. ६ च्या शासन निर्णयान्वये “मनरेगातंर्गत सुविधा संपन्न कुटुंब मिशन व सर्वागिण ग्राम समृध्दी योजना” अंमलात आणण्याचा निर्णय घेतला आहे.

२. उपरोक्त पार्श्वभूमीवर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामांची गती व गुणवत्ता वाढवून कामे पूर्ण करणे हे शासनाचे ध्येय साध्य करणे तसेच प्रशासकीय व तांत्रिक मंजूरीच्या अधिकाराबाबत धोरण अधिक स्पष्ट व सुटसुटीत करण्याकरीता संदर्भीय शासन निर्णय क्र. ५ मध्ये बदल करुन पुढीलप्रमाणे शासन आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत घेण्यात येणारे सर्व कामांना प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे अधिकार खालीलप्रमाणे सुधारीत करण्यात येत आहे.

| **वित्तीय मर्यादा** | **कामे करणारी शासकीय यंत्रणा** | **प्रशासकीय मान्यता देणारा अधिकारी** | **तांत्रिक मान्यता देणारा अधिकारी** |
|---|---|---|---|
| रु. २५ लाखापर्यंतच्या कामांकरीता | ग्रामपंचायत (सेक्यूलर लागू) | गट विकास अधिकारी तथा सह कार्यक्रम अधिकारी | पंचायत समिती/तालुका/उपविभाग स्तरावरील तांत्रिक अधिकारी (वैयक्तिक कामे रु.५ लाखाच्या मर्यादेत कनिष्ठ अभियंता व शाखा अभियंता पंचायत समिती/सार्वजनिक बांधकाम/मृद व जलसंधारण/जलसंपदा. सार्वजनिक कामे व रु. ५ लाख किंमतीच्या वरचे वैयक्तिक कामे उपअभियंता) |
| | इतर यंत्रणा जि.प. बांधकाम उपविभाग / राज्य बांधकाम / मृद व जलसंधारण/ जलसंपदा विभाग (सेक्यूलर लागू नाही) (Line Department) | कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम / राज्य बांधकाम/ मृद व जलसंधारण/ जलसंपदा विभाग तसेच जिल्हा स्तरावरील कृषी, वने, सामाजिक वनीकरण इत्यादी संबंधित अधिकारी | इतर यंत्रणेचे तालुका पातळीवरील तांत्रिक अधिकारी (उपअभियंता जि.प. बांधकाम / राज्य बांधकाम विभाग/ मृद व जलसंधारण/ जलसंपदा विभाग /तालुका कृषी अधिकारी/ वन परिक्षेत्र अधिकारी/वने तसेच सामाजिक वनीकरण इत्यादी |
| रु. २५ लाखांपेक्षा अधिक किंमतीच्या कामांकरीता | ग्रामपंचायत (सेक्यूलर लागू) | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा सह जिल्हा कार्यक्रम समन्वयक | जिल्हा परिषदेचा व तत्सम यंत्रणेचा विभाग पातळीवरील संबंधित तांत्रिक अधिकारी (जसे कार्यकारी अभियंता, जि.प.बांधकाम विभाग/ जि.प. मृद व जलसंधारण विभाग) |
| | पंचायत समिती जि.प. बांधकाम / जि.प. मृद व जलसंधारण उपविभाग (सेक्यूलर लागू नाही) (Line Department) | | |
| | इतर यंत्रणा राज्य बांधकाम विभाग / मृद व जलसंधारण/ जलसंपदा इत्यादी (सेक्यूलर लागू नाही) (Line Department) | जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक | तत्सम यंत्रणेचा विभाग पातळीवरील संबंधित तांत्रिक अधिकारी (जसे कार्यकारी अभियंता, राज्य बांधकाम/ मृद व जलसंधारण/ जलसंपदा विभाग इत्यादी) वा जिल्हा स्तरावरील इतर यंत्रणेचे अधिकारी |
| उपरोक्त वित्तीय मर्यादा या प्रत्येकी एका कामाकरीता आहेत. | | | |

उपरोक्त वित्तीय मर्यादा प्रशासकीय व तांत्रिक मान्यतेचे अधिकार हे केवळ महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गतचे कामास लागू राहतील. तसेच कार्यकारी अभियंता जि.प. बांधकाम/ राज्य बांधकाम विभाग / मृद व जलसंधारण / जलसंपदा विभाग तसेच कृषी, वने व सामाजिक वनीकरण या विभागांना अंमलबजावणी करणारा विभाग असे घोषीत करण्यात येत आहे. यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना Login Id

देण्याबाबतची कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्त (मनरेगा), नागपूर यांना या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहेत. तसेच दिनांक १५ मार्च, २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुरवठादार निश्चितीबाबतची प्रक्रीया कायम ठेवण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२३०१०३१८३०५५९०१६ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

NANDKUMAR VERMA

Digitally signed by NANDKUMAR VERMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, pseudonym=8DD51EE304775C22C23852DC8597F84B9FEF8A01, serialNumber=DCD3577EBF0E05E2A8B57095C152DC6CFB37C2BB83DA197788645DD8A362EBC5, cn=NANDKUMAR VERMA
Date: 2023.01.03 18:35:18 +05'30'

**( नंदकुमार )**
**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
३) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
४) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८) मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खासगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
९) मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा यांचे खासगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
१०) मा.समिती प्रमुख,महाराष्ट्र विधानमंडळ रोहयो समिती,विधानमंडळ सचिवालय, मुंबई
११) मुख्य सचिव यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व विभागीय आयुक्त.
१३) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र, नागपूर.
१४) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५) संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य,पुणे.
१६) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, पुणे.
१७) मुख्य अभियंता, लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे.
१८) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
१९) सर्व जिल्हाधिकारी.
२०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
२१) सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
२२) सर्व अधीक्षक अभियंता,पाटबंधारे/सर्व अधीक्षक अभियंता,लघु पाटबंधारे, (स्थानिकस्तर).
२३) संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई.
२४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दीकरीता).
२५) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी.
२६) सर्व उपायुक्त (विकास).
२७) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर.
२८) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ व २, मुंबई व नागपूर.
२९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
३०) सर्व सह सचिव/उप सचिव/अवर सचिव व कार्यासन अधिकारी, रोहयो.
३१) सर्व मंत्रालयीन विभाग.
३२) निवडनस्ती, रोहयो- १०.